**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांसह, राजस्थानात बिकानेर इथं २६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन

- ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची संयुक्त अरब अमिरातीच्या मंत्र्यांशी चर्चा

- अमेरिका आणि इराण मधली चर्चेची पाचवी फेरी उद्या होणार

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघ बाद फेरीत दाखल

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करून भारतानं पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज राजस्थानमध्ये बिकानेर इथं विविध विकास कामांच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. पाकिस्तान भारताबरोबरचं थेट युद्ध कधीच जिंकू शकत नाही, त्यामुळे दहशतवादाला प्रोत्साहन देऊन छुपं युद्ध खेळत आहे. पहलगाम इथल्या हल्ल्यानंतर संपूर्ण देश दहशतवादा विरोधात एकवटल्याचं ते यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री मोदी यांनी आज बिकानेर इथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून देशातल्या १८ राज्यांमधल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं उदघाटन केलं. यात महाराष्ट्रातल्या १५ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. परेल, चिंचपोकळी, वडाळा रोड, माटुंगा ही मुंबई उपनगरीय रेल्वे स्थानकं, त्याशिवाय सावदा, लोणंद, नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन, केडगाव, लासलगाव, मूर्तिजापूर जंक्शन, देवळाली, धुळे, सावदा, चांदा फोर्ट आणि आमगाव या स्थानकांचा यात समावेश

आहे. आपल्या या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी यांनी पलाना इथं सुमारे २६ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण केलं. यामध्ये रेल्वे विद्युतीकरण, रस्ते पायाभूत विकास आणि स्वच्छ ऊर्जेशी संबंधित विविध प्रकल्पांचा समावेश आहे. अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत देशातली १३०० पेक्षा जास्त रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे. या स्थानकांमध्ये स्थानिक वास्तुकलेचं प्रतिबिंब दिसेल तसंच दिव्यांगजनांसाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध केल्या जातील.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान युद्धबंदी विषयी भारत आणि पाकिस्तानमधे केवळ द्विपक्षीयच चर्चा झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. नेदरलँड मधल्या एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी म्हटलं आहे की, अमेरिकेचे गृहमंत्री माझ्याशी तर उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हांस हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी बोलले होते. दोन्ही देशांमधल्या संघर्षाच्या काळात इतर देशांनी बोलणं हे स्वाभाविक असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं येत्या १५ दिवसांत ३२ वेगवेगळ्या देशांना भेट देणार आहेत. खासदार **श्रीकांत शिंदे** यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ आज सकाळी संयुक्त अरब अमिरात इथं पोहोचलं. युएईच्या फेडरल नॅशनल कौन्सिलचे सदस्य अहमद मीर खुरी आणि युएईमधले भारतीय राजदूत संजय सुधीर यांनी या शिष्टमंडळाचं स्वागत केलं. ऑपरेशन सिंदूरचा भाग म्हणून अशा प्रकारचं आयोजन करणारा युएई हा पहिलाच देश असून यूएई चे सहिष्णुता आणि सहअस्तित्व मंत्री शेख नाहयान बिन मुबारक अल नाहयान यांच्यासोबत या शिष्टमंडळाची उच्चस्तरीय बैठक झाली. खासदार **संजय कुमार झा** यांच्या नेतृत्वाखालचं

शिष्टमंडळ आज जपानला पोहोचलं, तर द्रमुक खासदार **कनिमोळी करुणानिधी** यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ  पाच देशांच्या दौऱ्यावर रवाना झालं. हे शिष्टमंडळ स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशियाला भेट देईल. खासदार बैजयंत पांडा, खासदार रविशंकर प्रसाद, खासदार शशी थरूर आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालची  इतर चार  शिष्टमंडळं येत्या काही दिवसांत वेगवेगळ्या देशांना रवाना होतील. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री हे आज या उर्वरित चार बहुपक्षीय शिष्टमंडळांना माहिती देणार आहेत.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, किश्तवाड जिल्ह्यात सिंगपोरा चतरू इथल्या जंगलात आज सकाळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या माहितीवरून लष्करानं स्थानिक पोलिसांच्या सहकार्यानं शारी आणि मंद्राल ढोक परिसरातल्या जंगलात ही मोहीम राबवली.  २ ते ३ दहशतवादी सुरक्षा दलाच्या जाळ्यात अडकल्याचा अंदाज असून, ही मोहीम अजूनही सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

**<><><><><>**

पाकिस्तानमधल्या भारतीय दूतावासातल्या एका अधिकाऱ्याला निलंबित केलं असून त्यांना २४ तासाच्या आत पाकिस्तान सोडायलाही सांगण्यात आलं आहे. या अधिकाऱ्यांची वर्तणूक पदाला साजेशी नसल्याचं कारण देत हे आदेश देण्यात आल्याचं पाकिस्तानी प्रसार माध्यमांनी म्हटलं आहे. या आधी भारतानंही पाकिस्तानच्या एका अधिकाऱ्याला २४ तासाच्या आत दिल्ली सोडण्याचे आदेश दिले होते.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ विविध स्तरातून प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी  प्रतिक्रिया व्यक्त केली…

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२२ मे २०२५ - गुरुवार

**होल्ड... प्रशांत ठाकूर**

**<><><><><>**

अमेरिका आणि इराण मधली चर्चेची पाचवी फेरी उद्या होणार आहे. ओमानचे परराष्ट्र मंत्री सय्यद बद्र बिन हमाद बिन हमुद अल्बुसैदी यांनी ही घोषणा केली. इराणच्या अणू कार्यक्रमावर अमेरिकेनं लागू केलेले निर्बंध हटवण्याबाबत चर्चेच्या या फेऱ्या सुरु आहेत. अमेरिकेकडून होत असलेल्या अवाजवी मागण्यांमुळे या चर्चेत सहभागी होण्याबाबतचा निर्णय इराणनं  अजूनही राखून ठेवल्याचं इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अरघची यांनी काल सांगितलं. आपल्या अणु कार्यक्रमाबाबत पारदर्शकता राखण्याची इराणची तयारी आहे, मात्र अमेरिकेकडून निर्बंध हटवण्याच्या मुद्यावरही  चर्चा व्हावी, अशी इराणची भूमिका असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसी मधे आज सकाळी एक व्यक्तीनं केलेल्या गोळीबारात इस्त्रायली दूतावासातल्या दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. कॅपिटल ज्युईश म्युझियमजवळ झालेल्या या हल्ल्याचा संयुक्त राष्ट्रांतले  इस्त्रायली राजदूत डॅनी डॅनन यांनी तीव्र निषेध केला आहे. ज्यू विरोधी दहशतवादाविरोधात जगभरातल्या आपल्या नागरिकांचं  आणि प्रतिनिधींचं संरक्षण इस्त्रायल करेल, असा विश्वास डॅनन यांनी आपल्या समाज  माध्यमांवर  व्यक्त केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी २५ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा १२२ वा भाग असेल. नागरीकांना या कार्यक्रमासाठी आपल्या सूचना आणि विचार १८०० ११ ७८०० या नि:शुल्क क्रमांकावर २३ मे पर्यंत पाठवता येतील.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघानं बाद फेरीतलं स्थान मिळवलं आहे. मुंबईच्या वानखेडे मैदानावर काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं दिल्ली कॅपिटल्स संघावर ५९ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईच्या संघानं २० षटकांत १८० धावा केल्या. दिल्ली संघाचा डाव १८ षटकं आणि २ चेंडूत १२१ धावांवर आटोपला.आज अहमदाबाद इथं गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंटस् यांच्यात सामना होणार आहे. खेळ संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. गुजरात टायटन्स संघ आधीच बाद फेरीत दाखल झाला आहे.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य सरकारनं ऍप आधारित टॅक्सी धोरण काल जाहीर केलं. या धोरणात चालकाचं प्रशिक्षण, भाडं आकारणी आदींचा समावेश आहे. ओला, उबर यासारख्या कंपन्यांना हे धोरण लागू असेल. याद्वारे कॅब चालक आणि ग्राहक या दोघांनाही योग्य सेवा मिळावी यासाठी नियामक चौकट आखण्यात आली आहे.

<><><><><>

नैऋत्य मान्सून यंदा लवकर सुरु  होण्याची शक्यता असून, येत्या २ ते ३ दिवसांमध्ये तो केरळमध्ये प्रवेश करेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. महाराष्ट्र, कोकण, गोवा आणि गुजरातमध्ये पुढले २ ते ३ दिवस जोरदार ते अती जोरदार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान श्रीलंकेत मान्सून सर्वदूर पोहोचल्याचं वृत्त आहे.

//<><><><><>//